www.rajdand.com
सातार ।सोमवार
५.२.२०२४
पृष्ठ ४ ! मूल्य ४ !
rajdandlive
Reg.No.MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९

२५ वर्षे विश्वासार्हतेची

## लोकसभा निवडणुकीपूर्वी मोठा निर्णय

**दिल्ली :** आगामी लोकसभा निवडणुकीपूर्वी उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी मोठा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांच्या अध्यक्षतेखाली रविवारी मंत्रिमंडळाची बैठक झाली. बैठकीत मंत्रिमंडळाने समान नागरी संहितेच्या मसुद्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. ६ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या विधानसभेच्या अधिवेशनात हा प्रस्ताव मांडला जाणार आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीश रंजना प्रकाश देसाई यांच्या अध्यक्षतेखाली उत्तराखंड सरकारने समिती स्थापन केली होती.

विधानसभेची मंजूरी मिळाल्यानंतर समान नागरी कायदा लागू करणारं उत्तराखंड हे पहिलं राज्य होणार आहे. आगामी लोकसभा निवडणूक पाहता भाजपचे अनेक राज्य सरकारांनी राज्यपातळीवर समान नागरी कायदे तयार करण्याच्या प्रक्रिया सुरू केल्या आहेत. राम मंदिर, कलम ३७० आणि समान नागरी कायदा या तीन मुद्द्यांवर भाजप आगामी लोकसभा लढवेल, अशी शक्यता आहे.

आपल्या देशात केवळ विवाह घटस्फोट, पोटगी, दत्तक व संपत्तीचा वारसा अशा मर्यादित बाबींत विविध धर्मीयांना विविध कायदे लागू आहेत. समान नागरी कायद्याचा उद्देश असा आहे की, एक असा कायदा तयार करणं आहे, ज्यामध्ये विवाह, घटस्फोट, दत्तक घेणं, अशा विविध मुद्द्यांवर विविध समुदायांमध्ये असलेल्या व्यक्तिगत कायद्याची जागा एकच कायदा घेऊ शकेल. संविधानाच्या कलम ४४ मध्ये शासनसंस्थेसाठी समान नागरी कायदा करावा, असं डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मार्गदर्शक तत्त्वांमध्ये लिहिलेलं आहे. म्हणजेच काळानुरूप सरकारने समान नागरी कायद्यासाठी पुढाकार घ्यावा, असं मांडण्यात आलं होतं. तर देशात समान नागरी कायदा लागू करावा असं मत सर्वोच्च न्यायालयाने वारंवार मांडल्याचं देखील दिसून येतं.

# गोळीबाराला कारणीभूत जमिनीचा वाद




**कल्याण :** जमिनीच्या वादातून भाजप आमदार गणपत गायकवाड यांनी शिवसेना शिंदे गटाचे शहरप्रमुख महेश गायकवाड यांच्यावर पोलीस स्टेशनमध्येच गोळीबार केल्याची घटना घडली. पण हा जमिनीचा वाद या दोघांतील नव्हता तर गणपत गायकवाड आणि जाधव कुटुंबीयामध्ये होता. त्यानंतर जाधव कुटुंबाने महेश गायकडवाडांना या प्रकरणात मध्यस्ती करायची विनंती केली आणि नंतर हा सर्व प्रकार घडल्याचे समोर आले.

भाजप आमदार गणपत गायकवाड यांनी शिवसेना शिंदे गटाचे शहर प्रमुख महेश गायकवाड आणि राहुल पाटील यांच्यावर बंदुकीच्या गोळ्या झाडल्या आणि या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला. आमदार गायकवाड यांनी शनिवारी उल्हासनगरमधील हिल लाईन पोलीस ठाण्यातच हा गोळीबार केला.

कल्याणमधील द्वारली गावातील जमीन जाधव कुटुंबीयांनी एका विकासकाकडे करार करून डेव्हलपमेंटसाठी दिली आहे. मात्र त्या विकासकासोबत आमदार गणपत गायकवाड हे भागिदार आहेत. आमदार गणपत गायकवाड हे जमिनीवर कंपाउंड करण्यासाठी गेले, त्यावेळी जाधव कुटुंबाशी त्यांचा वाद झाला.

## गोळीबाराचे नेमके कारण समोर

### गणपत गायकवाड यांना १४ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी

**उल्हासनगरमध्ये झालेल्या गोळीबारानंतर आमदार गणपत गायकवाड यांना कोर्टात हजर करण्यात आले होते. पण अवघ्या काही मिनिटांत गणपत गायकवाड यांना कोर्टातून बाहेर काढण्यात आले. दरम्यान आमदार गणपत गायकवाड यांना १४ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली. न्यायाधीश ए.ए निकम यांच्या बेंचसमोर ही सुनावणी घेण्यात आली. गणपत गायकवाड यांनी गोळीबार केला असल्याची माहिती यावेळी पोलिसांनी कोर्टात दिली. त्यानंतर गणपत गायकवाड यांची बंदूक पोलिसांकडून जप्त करण्यात आली. तसेच या प्रकरणात आम्हाला सखोल चौकशी करायची असून फरार आरोपींचा देखील आम्हाला शोध घ्यायचा आहे, असंही पोलिसांनी कोर्टात सांगितलं. पोलिसांनी १४ दिवसांची पोलीस कोठडी द्यावी अशी मागणी पोलिसांनी केली, त्यानंतर कोर्टाने त्यांचा निकाल हा राखून ठेवला होता.**

जमिनीचे पैसे तुम्हाला दिले आहेत, तुम्ही कुठेही जा, माझे कोणीही काहीही करू शकत नाही असे त्यावेळी भाजपचे आमदार गायकवाड यांनी जाधव कुटुंबाला सांगितले. त्यावेळी जाधव कुटुंबाने शिवसेनेचे शहरप्रमुख महेश गायकवाड यांनी या वादात तडजोड करावी अशी विनंती केली.

जाधव कुटुंबाच्या विनंतीवरून महेश गायकवाड यांची या प्रकरणात एन्ट्री झाली आणि पुढे ही गोळीबाराची घटना घडली.

महेश गायकवाड यांच्यावर गोळीबार झाल्यानंतर जाधव कुटुंब हे घाबरलेल्या अवस्थेत आहे. या घटनेमुळे जाधव कुटुंब हे दहशतीखाली वावरत आहे. त्यांनी आपल्या मुलांना शाळेत पाठवणे बंद केले आहे. त्यानंतर जाधव यांनी आमदार गायकवाड यांच्यावर अ‍ॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांकडून आपल्याला संरक्षण मिळावे अशी जाधव कुटुंबाची मागणी आहे.

काय आहे प्रकरण?

भाजपचे कल्याण पूर्वचे आमदार गणपत गायकवाड यांनी शिवसेना शिंदे गटाच्या महेश गायकवाड यांच्यावर पोलीस ठाण्यातच गोळीबार केल्याचा प्रकार घडला आहे. या दोघांच्या दरम्यान एका ५० गुंठे जमिनीवरून वाद सुरु होता. शुक्रवारी हे प्रकरण थेट पोलीस ठाण्यात पोहचले. यावेळी गणपत गायकवाड यांचा मुलगा देखील पोलीस ठाण्यात होता. मात्र पोलीस कारवाई करत नसल्याचा आरोप करत स्वत: गणपत गायकवाड पोलीस ठाण्यात पोहचले आणि त्यांनी थेट शिंदे गटाचे कल्याण शहर प्रमुख महेश गायकवाड यांच्यावर गोळीबार केला. मी स्वत: पोलिसांसमोरच गोळी झाडली याचा मला याचा पश्चाताप नाही. कारण माझ्या मुलांना जर ते पोलिसांच्या समोर मारत असतील, तर मग मी काय करणार. पोलिसांनी मला पकडले, त्यामुळेच तो वाचला. मी त्यांना जीवे मारणार नव्हतो, पण पोलिसांच्या समोर जर असे कोणी करत असेल तर आत्मसंरक्षणासाठी हे करणे गरजेचे असल्याचे गणपत गायकवाड म्हणाले.

दरम्यान, भाजप आमदार गणपत गायकवाड यांना १४ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

जागेच्या वादातून उल्हासनगर पोलीस ठाण्यात आमदार गणपत गायकवाड यांनी शिवसेना शिंदे गटाचे शहर प्रमुख महेश गायकवाड आणि त्यांचे सहकारी राहुल पाटील यांच्यावर गोळीबार केला. या प्रकणार आमदार गायकवाड यांच्यासह आरोपींना अटक करण्यात आलीये. दरम्यान जागेच्या वादावरुन हा गोळीबार करण्यात आला अशी माहिती समोर आली होती. या प्रकरणात भाजप आमदार गणपत गायकवाड यांच्या आठ जणांच्या विरोधात अ‍ॅट्रॉसिटीचा गुन्हा जागा मालकाच्या तक्रारीवरुन दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे आता गणपत गायकवाड यांच्या अडचणीत आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

# काकांच्या मृत्यूची वाट पाहताय का?

## जितेंद्र आव्हाडांचा शाब्दिक प्रहार

**बारामती :** अजित पवारांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधला. त्यावेळी त्यांनी सांगितलं की लोकसभा निवडणुकीसाठी मी लवकरच उमेदवार जाहीर करणार आहे. त्यावेळी काही लोक येतील भावनिक साद घालतील, ही शेवटची निवडणूक आहे सांगतील. पण तुम्ही मात्र अजित पवार उभा आहे हे समजून मतदान करा. शेवटची निवडणूक सांगतील, कधी शेवटची निवडणूक असेल काय माहीत. असं वक्तव्य केलं होतं. अजित पवारांनी नाव न घेता ही टीका शरद पवार यांच्यावर केली होती. त्यानंतर आता या वक्तव्याचे पडसाद उमटू लागले आहेत. मला अजित पवारांबरोबर काम केल्याची लाज वाटते असं म्हणत जितेंद्र आव्हाड यांनी



त्यांना प्रत्युत्तर दिलं आहे.

आज अजित पवारांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधत असताना हद्द ओलांडली आहे. एखाद्या माणसाच्या मृत्यूची प्रार्थना करणं, याचना करणं हे माणुसकीला शोभणारं आहे काय याचा विचार अजित पवार यांनी जरुर करावा असं म्हणत जितेंद्र आव्हाड यांनी अजित पवारांवर टीका केली.

आपल्या काकाच्या मृत्यूची वाट बघतोय, हे राजकारण आहे का अजित पवार? भावनिक आवाहन करतील, ही शेवटची निवडणूक असेल. काय माहीत शेवटची निवडणूक कधी असेल? शरद पवार आहेत ते अजरामर राहतील, त्यांचं योगदान अजरामर असणार आहे हे विसरु नका. आज अजित पवारांनी सगळी हद्दच ओलांडली. असं म्हणत आव्हाडांनी त्यांना उत्तर दिलं आहे.

जितेंद्र आव्हाड म्हणाले, ''आपली उंची ओळखा कुठे शरद पवार आणि कुठे तुम्ही? अटल बिहारी वाजपेयी, मनमोहन सिंग हे देखील नावं काढतात. लाज वाटते मला तुमच्या सोबत काम केल्याची आधी पण वाटतच होती. शरद पवार देशाचे नेते तुम्हाला महाराष्ट्रात कोण ओळखत नाही. ज्या कुटुंबाने तुम्हाला सर्व दिले, ज्या माऊलीने तुम्हाला सर्व दिले तीच कुंकू कधी पुसलं जाईल याची आज तुम्ही वाट बघता असल घाणेरडं राजकारण महाराष्ट्राने कधी बघितलं नाही.''

# सरकारकडून प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांचे खच्चीकरण सुरू; विजय वडेट्टीवार यांचा हल्लाबोल

**मुंबई :** 'युएलसी घोटाळा प्रकरणात सक्त वसुली संचालनालयाने चौकशी केलेले अधिकारी दिलीप ढोले यांची सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक पदावर सरकारने नियुक्ती केली. डॉ. सुधाकर शिंदे यांची बृहन्मुंबई महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त म्हणून नियुक्ती केली आहे. अशाप्रकारच्या नियुक्त्यामुळे भारतीय प्रशासकयी सेवेत कार्यरत अधिकाऱ्यांचे खच्चीकरण होत असून मर्जितील अधिकाऱ्यांचा सरकारकडून लाड पुरवला जात आहे,'' असा आरोप विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.

प्रशासकीय अधिकाऱ्यांचे खच्चीकरण : ''राज्य सरकारकडून काही नियुक्त्या करण्यात आल्या, त्यात सिडको सहव्यवस्थापकीय संचालक आणि मुंबई म हापलिका अतिरिक्त आयुक्त पद समाविष्ट होते. अशा प्रकारच्या नियुक्तीमुळे भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी वर्गाचे खच्चीकरण होतय. सरकारकडून म हत्वाच्या पदांचे अवमूल्यन केले जात असून मर्जीतील अधिकाऱ्यांचे सरकार लाड पुरवतंय,'' अशी टीका विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर केली आहे.

अधिकाऱ्यांच्या नियमबाह्य नियुक्तीमुळं खच्चीकरण : वडेट्टीवार पुढं म्हणाले की, ''वास्तविक पाहता ढोले हे राज्य कर उपायुक्त (वस्तू व सेवाकर) या विभागातील अधिकारी असून सदरचे पद वर्ग एक दर्जाचे आहे. मात्र मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या जवळचे असल्याने आस्थापना संबंधतील सर्व नियम बाजूला ठेवून सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको या भारतीय प्रशासकीय सेवेतील समकक्ष पदावर त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यापूर्वीही देखील सर्व नियम डावलून ढोले यांची मीरा-भाईंदर महापालिकेच्या आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली होती. भा.प्र.से. कॅडरच्या पदावर भा.प्र.से. सेवेत नसलेल्या अधिकाऱ्यांच्या नियमबाह्य नियुक्तीमुळं सनदी सेवेतील अधिकाऱ्यांचे मनोधैर्य खच्चीकरण होत आहे,'' असा घणाघात वडेट्टीवार यांनी सरकार वर केला आहे.

मर्जितील अधिकाऱ्यांच्या बदल्या रद्द करा : मुंबई महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त म्हणून डॉ. सुधाकर शिंदे यांची नियुक्ती केलीय. खरंतर शिंदे हे भारतीय प्रशासकीय सेवतील अधिकारी नाहीत, ते भारतीय महसूल सेवेतील अधिकारी असतानाही इतर सनदी अधिकाऱ्यांना डावलून केवळ राजकीय पाठबळावर शिंदे यांची नियुक्ती चुकीची असल्याचा आरोप वडेट्टीवार यांनी केला आहे. सरकारनं मर्जितील अधिकाऱ्यांच्या बदल्या तत्काळ रद्द कराव्या, अशी मागणी विजय वडेट्टीवार यांनी सरकारकडे केली आहे.

# वेण्णालेक येथील २८ स्थानिक स्टॉलधारकांना मिळणार न्याय

## सातारा जिल्हाधिकारी यांनी चार आठवड्यात निर्णय घेण्याचे मुंबई उच्च न्यायालयाचे निर्देश

**महाबळेश्वर :** महाबळेश्वरचे प्रमुख आकर्षणाचे ठिकाण असलेल्या वेण्णालेक परिसरात वर्षानुवर्षे स्थानिक नागरीक छोटे-मोठे खाद्यपदार्थांचे स्टॉल लावून व्यावसाय करत आपला व आपल्या -कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते वेण्णालेक बोटक्लब समोरील रस्त्या पलिकडे असलेल्या मोकळ्या जागेमध्ये सुमारे २८ स्टॉलधारकांवर वनविभागाने जून २०२३ मध्ये अतिक्रमण विरोधी कारवाई करून हे स्टॉल हटवून वनविभागाने या जमीन मोठमोठे खड्डे खोदून ही जागा ताब्यात घेतली या कारवाईने बाधित झालेल्या २८ कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली होती याकडे गांभीर्याने लक्ष घालत माजी नगरसेवक कुमार शिंदे यांनी स्टोलधारकांच्यावतीने मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली मुंबई उच्च न्यायालयाने सातारा जिल्हाधिकारी यांनी स्टोलधारकांनी दिलेल्या निवेदनावर चार आठवड्यात निर्णय घेण्याचे मुंबई उच्च न्यायालयाचे निर्देश दिले असल्याचे माजी नागरसवेक कुमार शिंदे यांनी पत्रकारांना सांगितले

महाबळेश्वर येथील वेण्णालेक परिसरात मुख्य रस्त्याबाजूला २८ खाद्यपदार्थांचे स्टोल्स असून स्थानिक लोक गेली अनेक वर्षे या ठिकाणी आपला व्यवसाय करत होते दोन वर्ष कोरोनाप्रादुर्भावामुळे बंद असलेले व्यवसाय पुन्हा सुरु झाला मात्र पुन्हा एकदा उच्चस्तरीय सनियंत्रण समिती (क्ङचउ) ने हे स्टॉल बेद करण्याचे निर्देश वनविभागास दिले परंतु तत्कालिन जिल्हाधिकारी शेखर सिंह व उच्चस्तत्रीय सनियंत्रण समितीचे तत्कालिन





अध्यक्ष याना विनंती करत पुन्हा स्टॉल सुरू करण्यात आले परंतु जून २०२३ मध्ये तत्कालिन जिल्हाधिकारी रुचेश जयवंशी यांनी महाबळेश्वर येथे अतिक्रमण विरोधी कारवाई करण्याचे निर्देश प्रशासनानास दिले या आदेशाने वनविभागाने तत्परतेने प्रथम वेण्णालेक येथील स्थानिक गोरगरीब नागरिकांवर ही अतिक्रमण विरोधी कारवाईकरत हे स्टोल्स हटवले आपली रोजीरोटी वाचविल्यासाठी हे स्टॉल- -धारक सर्व लोकप्रतिनिधीकडे गेले परंतू यामध्ये अतिक्रमणे हटविली असल्या कारणाने या प्रकरणामध्ये पुढे काहीच झाले नाही यासाठी वनविभागाकडे वनजमिनीचा प्रस्ताव सादर करावा अशी उत्तरे अधिकाऱ्यांकडून मिळाली तदनंतर माजी नगरसेवक कुमार शिंदे यांना भेटून स्टोलधारकांनी लक्ष घालण्याची विनंती केली

माजी नगरसेवक कुमार शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली या स्टॉलधारकांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन आपले गाऱ्हाणे मांडले आम्ही सर्व स्टॉलधारक वेण्णलिक येथे सन १९७५ पासून छोटे-मोठे व्यावसाय करत उदरनिर्वाह करत असल्याचे काही पुरवे देखील दाखवले त्यानुसार मुख्यमंत्री शिंदे यांच्या सुचनेनुसार स्टोलधारकांनी २१ सप्टेंबर २०२३ रोजी सातारा जिल्हाधिकारी यांच्याकडे सर्व कागदपत्र पुराव्यानिशी एक निवेदन दिले व आमचे योग्य ते पुर्नवसन करावे अशी लेखी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली परंतू जिल्हाधिकारी यांनी या निवेदनावर कोणताही निर्णय घेतला नाही म्हणून यासर्व स्टॉलधारकांच्या वतीने कुमार शिंदे यांच्या मार्फत मुंबई उच्च न्यायालयामध्ये (रिट नं.२९९२/२३) ने याचिका दाखल केली या याचिकेमध्ये हे सर्व स्टॉलधारक वेण्णालेक परिसरात छोटे-मोठे व्यावसाय १९७५ पासून ते आजपर्यंत करत असल्याबाबतचे कागदोपत्री पुरावे,पालिका जागाभाडे वसूल केलेल्या पावत्या तसेच वनविभागानेही जागाभाडे वसूल केलेल्या पावत्या याचिकाकर्त्यांच्यावतीने दाखल केल्या तसेच वेण्णालेक येथे बंधारा बांधण्याच्या झालेल्या निर्णयानुसार नगरपरिषदेने सदर स्टॉलधारकांना करून दिलेले ठराव देखिल सादर करण्यात आले

वेण्णालेक व परिसराच्या जागेच्या मालकीवरून वन विभाग व नगरपरिषद यांच्यामध्ये वाद सुरू होते परंतु वास्तविक ही सर्व जमिन श्री क्षेत्र महाबळेश्वर देवस्थानच्या मालकीची असून वेण्णालेक परिसरातील एकूण १६६ एकर मिळकत ही वन विभागाने देवस्थान कडून १९४३ साली साठ वर्षाच्या कराराने लीजवर (भाडेपट्ट्यावर) तात्कालीन जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने घेतली होती त्यावेळी झालेल्या कराराप्रमाणे मिळकतीचे वार्षिक चार आणे एकरी भाडे आणि या जमिनीतून मिळणाऱ्या फायद्यामधून ५०% उत्पन्न श्री क्षेत्र महाबळेश्वर देवस्थानला देण्याचे मान्य केले होते परंतू १९७५ सालापासून वन विभागाने भाडे देणे बंद केले व फायदा देखील देण्यास नकार दिला देवस्थानने याबाबत अनेकवेळा मागणी केल्यास महाराष्ट्र खाजगी वन क्ट १९७५ चा दाखला देऊन सदरची जमीन ही वन विभागाची असल्याचे दावा करत या मिळकतीवर आपला हक्क दाखवू लागले यामुळे श्री क्षेत्र महाबळेश्वर देवस्थान ट्रस्टने वन विभागाच्या विरोधात १९९६ साली उत्पन्न मिळावे यासाठी दिवाणी न्यायालयात दावा दाखल केला व २००५ साली भाडेपट्टा करार संपल्याने मिळकत ताब्यात मिळावी यासाठी वेगळा दावा दाखल केला. अखेर २७ वर्षांच्या न्यायालयीन लढ्यानंतर अखेर दिवाणी न्यायालयातून श्री क्षेत्र महाबळेश्वर देवस्थानला न्याय मिळाला व वन विभागाला मिळकत ताब्यात देण्याचे आदेश दिले तसेच उत्पन्नाबाबत देखील पूर्ण हिशोब करुन ६% व्याजासह देवस्थानला उत्पन्न देण्याचे आदेश काही महिन्यांपूर्वी दिले गेले न्यायालयाच्या या निर्णयाविरुद्ध वनविभागाने वरील न्यायालयात अपील केले आहे परंतू अद्याप या प्रकरणावर न्यायालयाने कोणताही मनाई हुकूम वनविभागाच्या बाजूने दिला नाही ही सर्वच कागदपत्रे देखील याचिकाकर्त्यांनी उच्च न्यायालयात सादर केलेली आहेत

वेण्णालेक स्टॉलधारकांच्या याचिकेवर सुनावणी घेत मा उच्च न्यायालयाने जिल्हाधिकारी सातारा यांना स्टॉलधारकांनी दि. २१ सप्टेंबर २०२३ रोजी दिलेल्या लेखी निवेदनावर चार आठवड्यांमध्ये निर्णय घेण्याबाबतचे निर्देश दिले आहेत उच्च न्यायालयाच्या निर्णयांनुसार वेण्णालेक स्टॉलधारक संघटनेने जिल्हाधिकारी यांना लेखी निवेदन देऊन १९ जानेवारी २०२४ रोजी देऊन या प्रकरणावर लवकरात लवकर तारीख नेमण्याची विनंती केली असून आमच्या निवेदनावर जिल्हाधिकारी आमच्या व आमच्या कुंटुंबावर झालेल्या अन्यायाविरुद्ध न्याय देतील असे मत माजी नगरसेवक कुमार शिंदे यांनी पत्रकारांशी बोलताना व्यत केले यावेळी वेण्णालेक स्टॉलधारक संघटनेचे अस्लम डांगे,करीम डांगे,सिराज वारणे आदी उपस्थित होते.

# परिसस्पर्शाची आस



महाराष्ट्राला संस्कार आणि क्रांतीची शिकवण देणा-या साने गुरूजींच्या कर्मभूमीत अमळनेरमध्ये ९७ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन दिमाखात सुरू झाले आहे.

महाराष्ट्राला संस्कार आणि क्रांतीची शिकवण देणा-या साने गुरूजींच्या कर्मभूमीत अमळनेरमध्ये ९७ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन दिमाखात सुरू झाले आहे. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांनी ऋअमळनेरचे अमर हुतात्मेऋ हा पोवाडा लिहून अमळनेरच्या लढवय्या वृत्तीचा गौरव केला आहे. साने गुरुजींच्या संस्कारातून प्रेरणा घेऊन उत्तमराव पाटील यांच्या संपूर्ण कुटुंबाने स्वातंत्र्यलढ्यात झोकून दिले.

याच नगरीत आजपासून(ता.३) १८ वे विद्रोही मराठी साहित्य संमेलनही सुरू होत आहे. यानिमित्ताने बहिणाबाई चौधरी, बालकवी, महानोरांच्या खानदेशात होत असलेला साहित्याचा जागर साहित्यप्रेमी आणि रसिकांसाठीही पर्वणी ठरेल. अमळनेरसारख्या छोट्या शहरात अखिल भारतीय संमेलन घेऊन अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाने एक धाडसी पण कौतुकास्पद पायंडा पाडला आहे.

संमेलनाच्या निमित्ताने त्या परिसरातील वाड्.मयीन पर्यावरणाला निश्चितच चालना मिळू शकेल. संमेलनाला वारकऱ्यांच्या निष्ठेने दरवर्षी हजेरी लावणारे साहित्य रसिक ज्या स्वागतशील वृत्तीने संमेलनाचा विचार करतात, तेवढा सरळ विचार संमेलनाच्या आयोजकांच्या डोक्यात नसतो.

संमेलनाच्या स्थळनिश्चितीपासून, निधी मिळवण्याच्या उद्देशाने राजकारण सुरू होते आणि संमेलन पार पडेपर्यंत संमेलनावर राजकारणाचा आणि अर्थकारणाचा वरचष्मा असतो. संमेलनाला उपस्थित असलेले मुख्यमंत्री श्रोत्यांमध्ये पहिल्या रांगेत बसल्याची घटना अलीकडच्या दोन दशकांमधली आहे, यावर विश्वास बसणार नाही. याचे कारण आज मुख्यमंत्रीच नव्हे, तर त्यांच्या कर्मचारीवर्गासाठी मंचावर व्यवस्था करावी लागते.

निधी देणाऱ्या सरकारच्या उपकाराच्या ओझ्याखाली अभिव्यक्तीचा हा मंच किती वाकणार? हा प्रश्न आहे. संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी निवडणूक होत असताना काहीएक लोकशाही पद्धत होती. महामंडळाने निवडणूक बंद केली आणि महामंडळाच्या घटकसंस्थांमधील गटबाजी आणि शह-काटशहाचे राजकारण सुरू झाले.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन जिथे होते, त्याच शहरात त्याच तारखांना अलीकडच्या काळात विद्रोही साहित्य संमेलन भरवले जाते. अखिल भारतीय साहित्य संमेलन सर्वसमावेशक नाही आणि ते विशिष्ट वर्गाचे संमेलन असल्याचा आरोप करून विद्रोही संमेलन सुरू झाले. विद्रोहाची दखल घेऊन अखिल भारतीय संमेलनाने स्वत:मध्ये बदल घडवायला हवा होता, परंतु एखाद्या-दुसऱ्या वर्षाचा अपवाद वगळता तसे घडले नाही.

एकीकडे विद्रोही संमेलनात वर्तमानाला भिडणारे विषय असतात, तर अखिल भारतीय संमेलनात त्याच त्या पारंपरिक आणि वर्षानुवर्षे चर्वितचर्वण केलेल्या विषयांचे दळण दळले जाते. अखिल भारतीय संमेलनाच्या अध्यक्षपदी रवींद्र शोभणे यांची निवड करण्यात आली आहे. शोभणे यांची साहित्यसंपदा गुणात्मक आणि संख्यात्मकदृष्ट्याही दखलपात्र आहे.

अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणात शोभणे यांनी सरकारला मराठीविषयीच्या अनास्थेबद्दल काही सुनावले आहे आणि मराठी शाळा बंद पडत असल्याबद्दल संताप व्यक्त केला. पण यात सरकारइतकीच मराठी संस्था, विद्यार्थी आणि पालकवर्ग किंबहुना सर्वसामान्य मराठीजन या सर्वांचीच जबाबदारी आहे. ती कोणती याचे दिग्दर्शन अध्यक्षांकडून व्हायला हवे. त्यातून व्यापक सांस्कृतिक चळवळ उभी राहिली तरच काही बदल घडू शकेल.

अन्यथा संमेलने होत राहतील आणि मराठीविषयीचे अरण्यरुदनही. एकूणच या संमेलनांतून तशी धार का निर्माण होत नाही, याचे आत्मपरीक्षण आवश्यक आहे. समाजातील जळते प्रश्न हातात घेण्याच्या आणि वर्तमानाला भिडण्याच्या वृत्तीमुळेच लोकवर्गणीतून उभारलेल्या विद्रोही संमेलनात रसिकांची गर्दी अधिक असल्याचे चित्र अलीकडच्या काळात दिसू लागले आहे.

'कोटीच्या कोटीची उड्डाणे' घेणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या आयोजकांनी या गोष्टीचा विचार करायला हवा. तसे केले नाही तर विद्रोही प्रवाहापुढे 'अखिल भारतीय संमेलन' बाजूला फेकले जाईल. अमळनेरला अखिल भारतीय संमेलन घेताना साने गुरुजींची कर्मभूमी म्हणून घेण्यात आले;परंतु प्रत्यक्षात या संमेलनात साने गुरुजींचा विचार सोडून बाकी सगळे आहे.

महामंडळाच्या अशा धोरणामुळेच भालचंद्र नेमाडे यांच्यापासून यशवंत मनोहर यांच्यापर्यंतचे कसदार साहित्यिक संमेलनापासून दूर राहिले आहेत. शतकाकडे वाटचाल करणाऱ्या अखिल भारतीय संमेलनाने काळाबरोबर बदलायला हवे. मराठी भाषा मरत असल्याबद्दल नुसते गळे न काढता साहित्याशी तरुण पिढीला जोडून घ्यायला हवे. त्यासाठी संवादाच्या नव्या वाटा धुंडाळायला हव्यात.

अमळनेरमध्ये काही काळ राहिलेले शाहीर साबळे यांनी 'अमळनेरच्या परिसस्पर्शामुळे आपल्या आयुष्याचे सोने झाले' असे म्हटले आहे. अमळनेरच्या संमेलनाला गेलेल्या साहित्यरसिकांना आणि खानदेशातील साहित्यप्रेमींना तशी अनुभूती आली तर संमेलन सुफळ संपूर्ण झाले, असे नक्कीच म्हणता येईल.

## सातारा जिल्हाधिकारी कार्यालय नाजिक पोलीस ठाण्यात आले पाणी

**सातारा** : जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी ही प्रशासनाचे प्रमुख म्हणून सातारा जिल्हाधिकारी यांच्यावर आहे .त्यांच्याच प्रवेशद्वारा जवळ असलेल्या पोलीस ठाण्याला गेले चार महिने पाणीपुरवठा जोडणी नव्हती. ती जोडणी सातारा जिल्हा पालकमंत्री नामदार शंभूराजे साहेब व जिल्हाधिकारी श्री जितेंद्र डूडी साहेब, पोलीस अधीक्षक समीर शेख साहेब यांच्या प्रयत्नामुळे पाणीपुरवठा जोडणी लावण्यात आलेली आहे. गेली चार महिने रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई गट) युवक सातारा जिल्हाध्यक्ष आदित्य गायकवाड व कार्यकर्त्यांनी पाठपुरावा केला होता. या पाठपुराव्याला यश आलेले आहे.

सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार शंभूराजे देसाई साहेब ,जिल्हाधिकारी श्री जिंतेंद्र डूडी साहेब, पोलीस अधीक्षक समीर शेख साहेब या त्रिमूर्तीने काही प्रसार माध्यमातून आलेल्या बातम्यांची दखल घेऊन प्रश्न सोडवल्याबद्दल सातारा जिल्हा वासियांच्या वतीने त्यांचे व पत्रकार अजित जगताप, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ( गवई गट) सातारा जिल्हा युवक जिल्हाध्यक्ष आदित्य गायकवाड यांचे आभार मानले आहेत.तसेच अनेक मान्यवरांनी धन्यवाद दिले आहेत.







**सातारा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर असणाऱ्या पोलीस ठाण्यात चार महिन्याने पाणीपुरवठा जोडणी केल्याबद्दल अनेकांनी धन्यवाद दिले (छाया - अजित जगताप, सातारा)**

सातारा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर वर्षभरामध्ये अनेक आंदोलने, मोर्चे, निदर्शने उपोषण व आत्महत्या करण्याची नोटीस देणारी कार्यकर्ते यांची रेलचेल असते .अशा वेळेला पोलीस बंदोबस्त आवश्यक असल्यामुळे सातारा जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशद्वारा नजीक सातारा शहर पोलीस ठाणे अंतर्गत पोलीस चौकी उभारण्यात आलेली आहे.

या पोलीस चौकीचे चार महिन्यापूर्वी पालकमंत्री नामदार शंभूराज देसाई साहेब यांनी उद्घाघाटन सुद्धा केले होते. त्यांनी सुद्धा लवकरच पाणीपुरवठा जोडणी केली जाईल असे सांगितले व शब्द पाळला आहे. खऱ्या अर्थाने राज्य सरकार गतिमान असल्याचे कृतीतून दिसून आलेले आहे. त्यामुळे राज्य सरकारवर टीका करणाऱ्या ही कार्यकर्त्यांनी गतिमान राज्य सरकार काम करत असल्याचे अनुभव घेतला आहे. हे सुद्धा सांगण्यासाठी अनेक जण पुढे आले आहेत. हीच खरी लोकशाही असल्याचे मानले जात आहे.

## राज्यातील कारागृहात आता असणार अत्याधुनिक तिसऱ्या डोळ्याची नजर

### येरवडा कारागृहातील ८१२ सीसीटीव्ही यंत्रणेचे उद्घाटन

**पुणे** : कारागृहातील गैरप्रकार, कैद्यांची हाणामारी रोखण्यासाठी राज्यभरातील १६ मध्यवर्ती कारागृहात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत. पहिल्या टप्प्यात येरवडा, मुंबई मध्यवर्ती कारागृह, कल्याण जिल्हा कारागृह, भायखळा जिल्हा कारागृह, अमरावती मध्यवर्ती कारागृह आणि नागपूर मध्यवर्ती कारागृहात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. येरवडा कारागृहात ८१२ सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले असून, शनिवारी (ता. ३) सीसीटीव्ही कॅमेरा यंत्रणेचे उद्घाटन गृह विभागाच्या मुख्य सचिव राधिका रस्तोगी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी कारागृह विभागाचे प्रमुख अतिरिक्त पोलिस महासंचालक, कारागृह महानिरीक्षक अमिताभ गुप्ता, कारागृह उपमहानिरीक्षक डॉ. जालिंदर सुपेकर, उपमहानिरीक्षक स्वाती यांची उपस्थिती होती. कारागृहातील गैरप्रकार रोखणे, तसेच कैद्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे उपयुक्त ठरणार असल्याचे रस्तोगी यांनी नमूद केले.

कारागृहातील कैद्यांची हाणामारी, तसेच गैरप्रकार रोखण्यासाठी पहिल्या टप्प्यात येरवडा कारागृहात ८१२ सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे कारागृहातील घडामोडी आणि कैद्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यात येणार आहे. राज्यातील वेगवेगळ्या कारागृहांत सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आल्यानंतर नियंत्रण कक्षातून कारागृहातील प्रत्येक घडामोडींवर बारकाईने लक्ष ठेवले जाणार असल्याचे अमिताभ गुप्ता यांनी नमूद केले.

**कोणत्या कारागृहात किती कॅमेरे..**

येरवडा मध्यवर्ती कारागृहात ८१२ कॅमेरे, मुंबईतील मध्यवर्ती कारागृहात ३२०, कल्याणमधील जिल्हा कारागृहात २७०, भायखळा कारागृहात ९०, अमरावती मध्यवर्ती कारागृहात १०६, नागपूर मध्यवर्ती कारागृहात ७९६, नाशिक रोड मध्यवर्ती कारागृहात ९४१, नाशिकमधील किशोर सुधारालयात ८६, लातूर जिल्हा कारागृहात ४६०, जालना जिल्हा कारागृहात ३९९, धुळे जिल्हा कारागृहात ३३१, नंदूरबार जिल्हा कारागृहात ३६५, सिंधुदुर्ग जिल्हा कारागृहात ३१५ आणि गडचिरोली खुल्या कारागृहात ४३४ कॅमेरे बसवण्यात येणार आहेत.

९० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित..


शासनाकडून निधी मंजूर झाल्यावर राज्यातील उर्वरित ४४ कारागृहांत लवकरच सीसीटीव्ही कॅमेरे बसवले जातील. राज्यातील सर्व कारागृहात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यासाठी ९० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. याशिवाय प्रत्येक कारागृहात कैद्यांच्या झडतीसाठी सुरक्षा अधिकाऱ्यांची नेमणूक केली आहे. तसेच पॅनिक बटण देखील बसवले जाणार आहे.



**मागच्या काही दिवसांमध्ये कारागृहात मोबाइल आणि सीम आढळून आले होते. कारागृहात मोबाइल येऊ नये आणि यासाठी प्रत्येक कारागृहात बॉडी स्कॅनर यंत्रणा बसवली जाणार आहे. त्यामुळे कारागृहातील प्रत्येक कैद्यावर लक्ष राहणार आहे. कैद्यांना कुटुंबाशी संवाद वाढवण्यासाठी टेलिफोन सुविधा सुरू केली आहे. कैद्यांचे शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्यासाठी नव्याने बांधणाऱ्या कारागृहात ग्रंथालये आणि योगाची सुविधा मिळणार आहे.**

## शिरोळच्या कमलाबाई शिंदे आदर्श समाजसेविका हिरकणी पुरस्काराने सन्मानित

### कोल्हापूर येथे आदर्श फाउंडेशनतर्फे मान्यवरांच्या हस्ते शिंदे यांना पुरस्कार प्रदान ; सामाजिक कार्याचा गौरव



**शिरोळच्या माजी उपनगराध्यक्ष कमलाबाई शिंदे आदर्श माता पुरस्काराने सन्मानित**

**शिरोळ** : येथील माजी उपनगराध्यक्षा व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या कमलाबाई कृष्णराव शिंदे यांना आदर्श फाउंडेशन संस्थेच्या वतीने पर्सन ऑफ द इयर आदर्श समाजसेविका हिरकणी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

दरम्यान, महिलांनी कौटुंबिक जबाबदारी बरोबरच सर्वच क्षेत्रात भरारी घेतली आहे. महिला सक्षमपणे कर्तबगारी सिद्ध करीत आहेत . समाजाप्रती केलेल्या सामाजिक कार्याच्या दखल घेऊन माझा सन्मान झाला याविषयी आनंद वाटतो. आदर्श फाउंडेशन संस्था विविध क्षेत्रातील व्यक्तींना प्रोत्साहित करण्याचे काम करीत असून फाउंडेशनचे हे कार्य प्रेरणादायी आहे असे मत माजी उपनगराध्यक्षा कमलाबाई शिंदे यांनी व्यक्त केले

कोल्हापूर येथील राजर्षी शाहू स्मारक सभागृह येथे झालेल्या समारंभात कोल्हापुरी फेटा , सन्मानचिन्ह , सन्मानपत्र देऊन माजी उपनगराध्यक्षा शिंदे यांचा गौरव करण्यात आला. उद्धव ठाकरे शिवसेना सांगली जिल्हा प्रमुख योजना पाटील (येलूर ) या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या.यावेळी मान्यवरांच्या हस्ते यशोगाथा या विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले.

या समारंभास सोलापूरच्या सामाजिक न्याय प्रकल्प अधिकारी प्रणिता कांबळे , राज्य निरीक्षक दिपाली लोहार, पश्चिम महाराष्ट्र सरपंच संघटना अध्यक्ष प्रदीप माने पाटील, शाहू साखर कारखान्याच्या संचालिका रेखाताई पाटील ,सावर्डे बुद्रुक चे माजी सरपंच प्रताप पाटील, माजी सैनिक फेडरेशनचे जिल्हाध्यक्ष संजय माने ,ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या सुमन भगवानराव साळुंखे , अभिनेते डॉ दगडू माने , निवेदिता शिंदे , हर्षवर्धन शिंदे , स्नेहल शिंदे, अमरसिंह शिंदे ,शिल्पा महात्मे ,अश्विनी माळी ,संजय भोसले , संजय काटे यांच्यासह आदर्श फाउंडेशनचे प्रमुख विजय लोहार , कार्यवाह वनिता लोहार आदि मान्यवर उपस्थित होते.

## काँग्रेसच्या बालेकिल्ल्यात राष्ट्रवादीचा उमेदवार

### काँग्रेसकडे उमेदवार नाही

**दोन वेळच्या पराभवानंतर इंडिया आघाडीकडून लोकसभेची निवडणूक लढण्याकरता मोर्चेबांधणी करण्यात येत आहे. त्यामध्ये जागा वाटपाच्या अनुषंगाने देखील चर्चा होत आहेत. सध्या कुठल्याही जागांवर अंतिम निर्णय झालेले नसले तरी उमेदवारांची नावे पुढे येऊ लागली आहे. वर्धा लोकसभा मतदारसंघावर काँग्रेसने कायम दावेदारी केली आहे.**

**गेल्या काही दिवसात माजी मंत्री सुनील केदार, भाजपमधून काँग्रेसमध्ये आलेले शिरीष गोडे, शेतकरी नेते शैलेश अग्रवाल, आमदार रणजित कांबळे ही नावे काँग्रेसकडून चर्चेत होती. पण सुनील केदार तुरुंगात गेल्याने केदार यांचे नाव मागे पडले आहे. काँग्रेसकडून दावेदारी केली जात असताना मोठे नाव मात्र अजून पुढे आले नाही आणि स्वत:हून कोणता नेता येथे निवडणूक लढण्यास इच्छुक दिसून येत नाही.**

### वर्धा लोकसभेकरता राष्ट्रवादीच्या हर्षवर्धन देशमुखांना कामाला लागण्याचे आदेश?

**वर्धा** : वर्धा लोकसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसकडून अमरावतीचे हर्षवर्धन देशमुख यांचे नाव पुढे आल्याने महाविकास आघाडीत खळबळ उडाली आहे. शरद पवार यांच्याकडून कामाला लागण्याचे आदेश दिल्याने काँग्रेसच्या गोटात स्मशान शांतता दिसून येतेय.

विशेष म्हणजे वर्धा लोकसभा मतदारसंघ गेल्या कित्येक वर्षापासून काँग्रेसचा बालेकिल्ला राहिला आहे. या बालेकिल्लामध्ये गेल्या दोन निवडणुकीपासून आता भाजपाचा खासदार आहे. अशात ही जागा राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाला जागा जाणार असे चित्र निर्माण झाले आहे. तर दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाकडूनही महायुतीमधून वर्धा लोकसभेची जागा मागितली जात आहे.

वर्धा जिल्हा म्हटले की लोकसभेकरता काँग्रेस उमदेवार डोळ्यापुढे येते. पण मागील दोन निवडणुकीत भाजपकडून काँग्रेसच्या उमेदवारांचा मोठा पराभव झाल्याने यावेळी काँग्रेसच्या दावेदारीवर घटक पक्षांकडून प्रश्न निर्माण होऊ लागले आहे. काँग्रेसकडून लोकसभेकरिता उमेदवार कोण? असा प्रश्न कायम असताना महाविकास आघाडीकडून वर्धा लोकसभेची उमेदवारी राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार गटाचे हर्षवर्धन देशमुख यांना मिळणार असल्याचे स्पष्ट होऊ लागले आहे. शरद पवार यांनी वर्धा लोकसभेची तयारी करण्यास देशमुख यांना सांगितल आहे. पवारांच्या आदेशानंतर हर्षवर्धन देशमुखांनी स्थानिक नेत्यांना त्याची तयारी सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत.

एकीकडे काँग्रेसकडून दावेदारी केली जात असताना राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे अमरावती जिल्ह्यातील वरुड येथील हर्षवर्धन देशमुख यांचे नाव पुढे आले आहे. वर्धा लोकसभा मतदारसंघात वरुड मोर्शी मतदारसंघ येतो.वर्धा लोकसभा मतदारसंघाची उमेदवारी हर्षवर्धन देशमुख यांना मिळेल, अशी माहिती पक्षांतर्गत सूत्रांकडून मिळते आहे. मागील तीन दिवसांपासून हर्षवर्धन देशमुख यांच्या नावाची चर्चा सुरू आहे.

काँग्रेस तसेच राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये देखील देशमुख यांच्या नावाची उमेदवारीची चर्चा सुरू आहे. महाविकास आघाडीत हर्षवर्धन देशमुख यांचे नाव पुढे आल्यानंतर राजकीय गोटात मात्र चांगलीच खळबळ निर्माण झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार यांनी दोन दिवसापूर्वी हर्षवर्धन देशमुख यांना वर्धा लोकसभेकरीता कामाला लागण्यास सांगितल्याचे कळते. थेट शरद पवार यांनीच सांगितल्यानंतर देशमुख यांनी वर्धा जिल्ह्यातील नेत्यांना ही माहिती दिली. मात्र याबाबत पदाधिकारी स्पष्ट बोलण्यास तयार नसल्याचे दिसून येते.

काँग्रेस हा आमचा परंपरागत मतदारसंघ असल्याने आम्हालाच उमेदवारी मिळाली पाहिजे असा दावा काँग्रेसकडून केला जात असल्याने उमेदवारी वरून कलगीतुरा रंगण्याची शक्यता आहे.

**अजित पवार गटाकडूनही तयारी सुरू**

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला ही जागा सुटली तर महायुतीमधील राष्ट्रवादी अजित पवार गट देखील माजी केंद्रीय मंत्री सुबोध मोहिते यांच्यासाठी वर्धा लोकसभेची जागा मागते आहे. त्यामुळे पुढे शरद पवार गट विरुद्ध अजित पवार गट असा सामना देखील लढला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# गांधी भवनमधील लोकसंसदमध्ये परिवर्तनाचा निर्धार

**पुणे:** रविवारी गांधी भवन येथे झालेल्या लोकसंसद मध्ये परिवर्तनाचा निर्धार करण्यात आला! नागरीक,सिव्हील सोसायटी आता घरात बसणार नाही तर भाजपच्या विरोधात मतदान होईपर्यंत मैदानात खंबीरपणे काम करणार आहे, असे या लोक संसद मध्ये निक्षून सांगण्यात आले.

युवक क्रांती दल,रिपब्लिक युवा मोर्चा,निर्भय बनो,पँथर आर्मी,स्वराज्य क्रांती सेना,संविधान प्रचारक चळवळ,सत्यशोधक बहुजन आघाडी,संविधानिक राष्ट्रवाद मंच आणि अभ्यासिका विद्यार्थी कृती समिती यांच्या वतीने लोकसंसद चे आयोजन करण्यात आले.

केंद्र सरकार भारतीय संसदेला धर्मसंसद बनविण्याचा प्रयत्न करत आहे, हा प्रयत्न हाणून पाडण्यासाठी भाजपविरोधी पक्ष संघटनांनी रविवारी , दि.४ फेब्रुवारी रोजी 'लोकसंसद' हा कार्यक्रम आयोजित केला . त्याला मोठा प्रतिसाद मिळाला.'लोकसभा निवडणुकीत सत्ता परिवर्तन करण्यासाठी सच्चा भारतीय मतदारांचे जनआंदोलन ' या उद्देशाने लोकसंसद उपक्रम आयोजित करण्यात आला.

प्रारंभी संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.सद्य स्थिती आणि भविष्याचा वेध,सत्ता परिवर्तनाची व्यूह रचना , मोदी सरकारची १० अपयशी वर्षे, भाजपचा खरा अजेंडा, सत्ता परिवर्तनाची रण नीती अशी अनेक सत्रे या लोक संसद मध्ये आयोजित करण्यात आली होती.

युवक क्रांती दलाचे संस्थापक डॉ. कुमार सप्तर्षी यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम कोथरूड येथील गांधी भवनात दुपारी एक ते सायंकाळी पाच या झाला . लोकसंसदेत रिपब्लिकन युवा मोर्चाचे राहुल डंबाळे हे स्वागताध्यक्ष होते. डॉ.विश्वंभर चौधरी, डॉ अभिजित वैद्य,अभ्यासक चंद्रकांत झटाले, सामाजिक कार्यकर्ते अब्दुल सत्तार शहा, धर्मगुरू बिशप थॉमस डाबरे, ह भ प धर्मकिर्ती परभणीकर, युनूस तांबटकर अशा अनेक मान्यवरांनी भाषणे केली.




सभागृहात डॉ अभिजित वैद्य,डॉ. अच्युत गोडबोले, आनंद करंदीकर,डॉ. उर्मिला सप्तर्षी,डॉ प्रवीण सप्तर्षी, अन्वर राजन, प्रशांत कोठदिया, फिरोज मुल्ला,अभय छाजेड, संदीप बर्वे, जांबुवंत मनोहर, उत्पल व. बा., रवींद्र धनक,अप्पा अनारसे, एम एस जाधव, इद्रिस कारी सुदर्शन चखाले आदी मान्यवर उपस्थित होते.

स्वागताध्यक्ष राहुल डंबाळे यांनी लोकसंसदेच्या आयोजनामागील हेतू स्पष्ट केला. लोकशाही व्यवस्था टिकली पाहिजे, असे ज्यांना ज्यांना वाटते त्यांच्यासाठी लोकसंसद हे जनआंदोलन आहे.नरेंद्र मोदींची लोकप्रियता, भाजपची ताकद गोबेल्स नीतीने तयार केली असून ती खोटी आहे, असे ते म्हणाले.

सिव्हील सोसायटी गप्प बसणार नाही: डॉ विश्वंभर चौधरी

डॉ. विश्वंभर चौधरी म्हणाले,' इंडिया आघाडीची ताकद अजूनही चांगली आहे. भाजप आपली ताकद फुगवून सांगत आहे. भाजपचे दक्षिणेचे दार बंद झाले आहेत. पूर्वोत्तर भागात भाजप विरोधी वातावरण आहे.विरोधी पक्षाला हतबलता वाटली तर नागरिकांनी, सिव्हील सोसायटीने पुढे येवून या पक्षांना युद्धासाठी तयार केले पाहिजे. शेतकरी भाजपाच्या विरोधात गेले आहेत. आर्थिक धोरणांमुळे मोदी सरकार हरणार आहे.कितीही पळपुटे बाजीराव महाराष्ट्रात भाजपकडे गेले तरी इथे ४७ टक्के मते इंडीया आघाडी कडे आहेत. चंद्रकांत पाटील हे कोथरुड मधून निवडणुक जिंकणार नाहित, असे भाजपचे लोक बोलतात.देशात भाजपा आघाडी २५० पर्यंत आटपणार आहे. नंतर भाजप अंतर्गत मतभेद उफाळून येणार आहे. उद्धव ठाकरे, शरद पवार यांच्या बद्दल प्रचंड सहानुभूती आहे. राज्यात १३ जागांच्या वर भाजपा जाणार नाही.उत्तरेची लादली जाणारी संस्कृती ठोकरून महाराष्ट्र धर्म जपला पाहिजे.

अनैतिक कारभारी बदलणे हाही सत्याग्रह: डॉ. सप्तर्षी

डॉ. कुमार सप्तर्षी म्हणाले,' नरेंद्र मोदी यांनी खोटे बोलण्याचा जागतिक विक्रम केला आहे. बकासुराची भूक भागत नसते, त्या प्रमाणे हे रोज एक मुख्यमंत्री खात सुटले आहेत. मोदींनी, शहांनी सर्व राजकारण खराब करून टाकले आहे.

लोकसभा निवडणुक होईपर्यंत अनेक अटक सत्रे होणार आहेत.इडी ला पैसै खाणारे भाजपवाले का दिसत नाहीत? ज्यांना निवडून दिले, ते काम करीत नसल्याने मतदारांनी निवडणुक हाती घ्यावी. अनैतिक कारभारी बदलणे हाच सत्याग्रह आहे.

ह.भ.प.धर्मकिर्ती परभणीकर म्हणाले, ' भाजपच्या राज्यात सलोख्याचे प्रदेश उध्वस्त करणे चालू आहे. वारकरी परंपरेचे ब्राहमणीकरण करणे चालू आहे. वारकरी मुल्यांच्या विरोधात काम सुरू आहे. आम्हीं महाराष्ट्र हातातून जावू देणार नाही. दंगली करणाऱ्या व्यक्तीच्या हाती सत्ता जावू देणार नाही'.

बिशप थॉमस डाबरे म्हणाले, ' संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांचा महाराष्ट्र आहे.धर्मा धर्मात असंतोष वाढीस लागणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे. अल्पसंख्य समुदायाला सुरक्षित वाटेल असे वातावरण देशात असले पाहिजे. कोणीही ईतर धर्मा विरोधात विधाने करता कामा नये. गरिबांची स्थिती सुधारली पाहिजे'.

# कोल्हापूरची जागा कॉंग्रेसलाच मिळण्यासाठी प्रयत्नशील : सतेज पाटील



**कोल्हापूर :** कोल्हापूर लोकसभा मतदारसंघात कॉंग्रेस पक्षाचे तीन विधानसभेचे आमदार असल्याने येथे आमची ताकद आहे. त्यामुळे माझ्यासह आमदार पी. एन. पाटील यांनी ही जागा कॉंग्रेसला मिळावी, असे पक्ष श्रेष्ठींना सांगितले. साधारणता शनिवार पर्यंत जागा वाटपावर शिक्कामोर्तब होईल, त्यानंतर कळेल ही जागा कोणाकडे आहे, असे सूचक वक्तव्य कॉंग्रेसचे विधान परिषदेतील गटनेते आमदार सतेज पाटील यांनी शनिवारी पत्रकारांशी बोलताना केले.

आमदार पाटील म्हणाले, महायुतीमध्ये अद्याप जागांबाबत चर्चाच नाही. भाजप ३० जागा लढविणार आहे का? शिंदे गट, राष्ट्रवादी कॉंग्रेसला जागा मिळणार का? याबाबत काहीच हालचाली नाहीत. महाविकास आघाडीमध्ये किमान चर्चा तरी सुरु आहे. आमच्या दिल्ली व मुंबई स्तरावर बैठका झाल्या आहेत. तिन्ही पक्षांचे नेते दिवस दिवसभर बसून जागा वाटपाचा तिढा सोडवत आहेत. शनिवार पर्यंत अंतिम निर्णय होईल. कोल्हापूरच्या जागेवर राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार गट) व शिवसेनेने (उबाठा) दावा करणे चुकीचे नाही. मात्र, आमचे तीन आमदार असल्याने ही जागा आम्हालाच मिळावी, यासाठी प्रयत्नशील आहे. कॉंग्रेसला जागा मिळाली तर येथून चांगला व ताकदवान उमेदवार देऊ. जागेच्या मागणीवरुन आघाडीत कोणत्याही प्रकारचे मतभेद नाहीत, तिन्ही पक्ष एकसंध असून आघाडीचा उमेदवार निवडून येईल, असा विश्वासही आमदार पाटील यांनी व्यक्त केला.

# ''भाजपात जाण्यासाठी माझ्यावर दबाव''
# केजरीवालांच्या वक्तव्यावर गौतम गंभीरचा टोला

**दिल्ली :** विरोधी पक्षांमधील अनेक मोठे नेते सक्तवसुली संचालनालय, आयकर विभाग, गुन्हे अन्वेशन विभागासारख्या केंद्रीय तपास यंत्रणांच्या चौकशीच्या फेऱ्यात अडकले आहेत. अशाच एका प्रकरणात झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना त्यांच्या पदाचा राजीनामा द्यावा लागला आहे. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यामागेही चौकशीचा ससेमिरा चालू आहे. अशातच केजरीवाल यांनी आज सत्ताधारी भारतीय जनता पार्टीवर गंभीर आरोप केले आहेत. भाजपात प्रवेश करण्यासाठी माझ्यावर दबाव टाकला जातोय, असं केजरीवाल म्हणाले. भाजपात गेल्यावर सगळे खून माफ होतात, आम्ही काहीही चुकीचं केलेलं नाही. काहीही झालं तरी आम्ही झुकणार नाही.

आम आदमी पार्टीचे प्रमुख केजरीवाल म्हणाले, ''आजकाल हे लोक (भाजपा) आमच्या मागे लागले आहेत. तुम्ही वर्तमानपत्रांमध्ये वाचलंच असेल, मनीष सिसोदिया यांना भाजपाने तुरुंगात टाकलं आहे. हे म्हणतात सिसोदियांनी भ्रष्टाचार केला आहे. सकाळी सहा वाजता ते शाळा-शाळांमध्ये जायचे. कुठला भ्रष्टाचारी सकाळी शाळांमध्ये जातो. जो भ्रष्टाचार करतो तो मद्यपान करतो, त्याला इतरही अनेक प्रकारची व्यसनं असतात, त्याचबरोबर तो चुकीची कामं करतो.

# केजरीवालांनी ईडीचं ५ वेळा समन्स धुडकावलं

दिल्लीत येणाऱ्या काही दिवसात राजकीय सत्तासंघर्ष पाहायला मिळाला, नवल अजिबात वाटणार नाही. बिहार, झारखंड आता दिल्लीचा नंबर असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. अरविंद केजरीवाल यांच्याविरोधात ईडी कोर्टात गेली आहे. केजरीवाल यांनी ईडीचे समन्स पाचवेळा धुडकावले आहेत. त्यामुळे आता कोर्ट काय निर्णय देणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

ईडी कोर्टात गेल्यानंतर आता अरविंद केजरीवाल यांनी मोठा गौप्यस्फोट केला आहे. भाजपने पक्षात येण्याची ऑफर दिल्याचे केजरीवाल म्हणाले. भाजपचं मोठं षडयंत्र आहे. भाजप कितीही षडयंत्र रचू शकतात पण ते अपयशी होतील.

मला भाजपने ऑफर दिली पण मी त्यांना नकार दिला आहे. भाजपमध्ये गेले तर सर्व गुन्हे माफ होतात. आम्ही काय चूक केली. आम्ही शाळा रुग्णालये, रस्ते, बांधत आहोत. गटारांची दुरुस्ती करत आहोत. हा गुन्हा आहे का?, असा सवाल अरविंद केजरीवाल यांनी उपस्थित केला आहे. अरविंद केजरीवाल या भाजने दिलेल्या ऑफरच्या दाव्यामुळे अडचणीत देखील येऊ शकतात. दिल्लीतील सरकार पाडण्यासाठी भाजपने सात आप आमदारांना प्रत्येकी २५ कोटी देऊ केल्याच्या आरोप केजरीवाल यांनी केला होता. याबाबत दिल्ली पोलिसांच्या गुन्हे शाखेकडून त्यांना नोटीस देखील मिळाली.

ईडीने अबकारी धोरणातील कथित घोटाळ्याच्या संदर्भात चौकशीसाठी हजर राहण्यासाठी, पाच वेळा समन्स बजावूनही केजरीवाल यांच्या पालन न केल्याबद्दल शहराच्या राऊस अव्हेन्यू न्यायालयात धाव घेतली . निर्दोष असल्याचा दावा करताना केजरीवाल आणि आपने भाजपवर 'राजकीय जादूटोणा'चा आरोप केला आहे. आर्थिक गुन्ह्यांची चौकशी करणारी ईडी ही संस्था सध्या भाजपच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारला अहवाल देते. तसेत दिल्ली पोलिसही केंद्र सरकारच्या अखत्यारीत येतात.

## भारतीय दूतावासातील कर्मचारी सत्येंद्र सिवल हनी ट्रॅपच्या जाळ्यात

**मेरठ :** उत्तर प्रदेशमधील दहशतवादी विरोधी पथकाने भारतीय परराष्ट्र मंत्रालयाच्या एका कर्मचाऱ्याला उत्तर प्रदेशच्या मेरठ येथे अटक केली आहे. हा कर्मचारी रशियाची राजधानी मॉस्कोमधील भारतीय दूतावास कार्यालयात कार्यरत असताना त्याने पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणेसाठी काम केले, असा आरोप त्यावर ठेवण्यात आला आहे. सत्येंद्र सिवल असे नाव असलेल्या कर्मचाऱ्याने २०२१ साली मॉस्कोमधील दूतावासात काम केले होते. सत्येंद्र सिवलने भारतीय लष्कर आणि काही गुप्त धोरणांची माहिती पाकिस्तानला दिली, असे चौकशीतून समोर आले आहे. पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणेने सत्येंद्र सिवलला हनी ट्रॅपच्या माध्यमातून जाळ्यात ओढले, असे सांगितले जाते.



देवपाल शाळेच्या साक्षी खुळे हिला बक्षीस देऊन सन्मानित करताना मान्यवर.

# तरुण खवळले तर प्रलय येईल
# संमेलनाध्यक्ष शोभणे यांचा सरकारला इशारा

९७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उदघाटन शुक्रवारी अमळनेर येथे झाले. यावेळी शोभणे अध्यक्ष पदावरून बोलत होते. या संमेलनाला लोकसभेच्या माजी अध्यक्ष सुमित्रा महाजन यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन झाले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उपमुख्यमंत्री अजित पवार, भाषा व शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर. राज्याचे पाणीपुरवठा मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील. ग्रामविकास मंत्री गिरीष महाजन, महामंडळाच्या अध्यक्ष उषा तांबे व महामंडळाचे सर्व पदाधिकारी, आयोजक उपस्थित होते.



यावेळी संमेलनाध्यक्ष म्हणाले, शिक्षण क्षेत्रात आता आपल्याला काहीही करायचे नाही, असे ठरवून सरकारने या क्षेत्राकडे पाठ फिरवली आहे. एकीकडे प्राध्यापकांच्या जागा रिकाम्या आहेतर तर दुसरीकडे आज हजारो उच्चशिक्षित तरुण प्राध्यापकाची नोकरी मिळवण्याच्या प्रतीक्षेत म्हातारे झाले आहेत. शिक्षणाचा बाजार करणारी मंडळी शिक्षण व्यवस्थेच्या केंद्रस्थानी बसली आहे. हे खूप धोकादायक आहे. तरुणाईचा तुम्ही किती अंत पाहणार आहात. असा खडा सवालही शोभणे यांनी केला.

प्राचिन काळी धर्म सर्वोच्चपदी होता. धर्मसत्ताक राज्ये ही धर्माची वेगळी गरज म्हणून निर्माण झाली. पुढे राजसत्तेने धर्मसत्तेचे जोखड झुगारून देत धर्मसत्तेलाच आपल्या अंकित ठेवले.पुढे हाच राजा सर्वोच्च समजला जाऊ लागला, धर्माचा रक्षणकर्ता म्हणून ओळखला जाऊ लागला, इतिहासाची हीच चक्रे आता पुन्हा नव्या रूपाने फिरू लागली आहेत, याकडेही शोभणे यांनी आपल्या भाषणात आवर्जुन लक्ष वेधले.

# लांबउडी स्पर्धेत देवपालची साक्षी खुळे जिल्ह्यात प्रथम

**वेल्हे :** पुणे जिल्हा परिषदेच्या वतीने बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडानगरीत आयोजित केलेल्या यशवंतराव चव्हाण कला, क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवात लांबउडी स्पर्धेतील मुलींच्या मोठ्या गटातून देवपाल (ता. वेल्हे) या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची साक्षी राजू खुळे या विद्यार्थिनीने जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकाविला.

गतवर्षी या विद्यार्थिनीने जिल्हास्तरावर तृतीय क्रमांक पटकाविला होता. यंदा मात्र प्रथम क्रमांकाला गवसणी घातली आहे.

या यशासाठी शाळेचे मुख्याध्यापक कांचन शिंदे , वर्गशिक्षक सुनिल माळवे, सहकारी शिक्षक विनोद कदम, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पोपट शिळीमकर, उपाध्यक्ष राजू खुळे यांनी परिश्रम घेतले.

या यशाबद्दल माजी जिल्हा परिषद सदस्य अमोल नलावडे, शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड, वेल्ह्याचे गटविकास अधिकारी पंकज शेळके, गटशिक्षणाधिकारी चंद्रकांत उगले, शिक्षण विस्तार अधिकारी दीपक नलावडे आदींनी अभिनंदन केले.

## पुणेकरांच्या समस्या सोडविण्यासाठी 'वेकअप पुणेकर' लोकचळवळ

# माजी आमदार मोहन जोशी यांची पत्रकार परिषदेत माहिती

**पुणे :** पुणेकरांना दैनंदिन जीवनात भेडसावणाऱ्या नागरी समस्यांवर उत्तरेही पुणेकरांकडूनच घेऊन ती संबंधित खात्याकडे मांडून त्यावर उपाययोजना करण्यासाठी 'वेकअप पुणेकर' ही लोकचळवळ सोमवार, दि. ५ फेब्रुवारीपासून सुरू करीत आहोत, अशी माहिती 'वेकअप पुणेकर'चे संयोजक माजी आमदार मोहन जोशी यांनी आज (रविवारी) पत्रकार परिषदेत बोलताना दिली. पुण्यातील वाहतुक कोंडी फोडण्यासाठी 'अडकलाय पुणेकर' मोहीम राबविणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी प्रवीणकुमार बिरादार, प्रथमेश आबनावे, रोहन सुरवसे पाटील, मिलिंद गवळी आदी उपस्थित होते.







मोहन जोशी म्हणाले, गेल्या दहा वर्षात पुण्याचा विस्तार झाला, लोकसंख्या वाढली त्याबरोबर ट्रॅफिक, पाणीपुरवठा, आरोग्य, स्वच्छता, हवेचे प्रदुषण याबाबतचे प्रश्नही निर्माण झाले. या प्रश्नांवर उपाययोजना काय असाव्यात? याची उत्तरे पुणेकरांकडूनच घ्यावीत, त्यातून पुणेकरांमध्ये जागृती निर्माण होईल, जनमताचा रेटा निर्माण झाला की समस्या नेमकेपणाने सोडविणे अधिक सोपे जाईल. अशा उद्देशाने 'वेकअप पुणेकर' ही लोकचळवळ उभी करीत आहोत. यात स्वयंसेवी संस्था, जागरूक नागरिक, विविध विषयांचे तज्ञ, सामाजिक कार्यकर्ते सहभागी असतील.

शहराच्या सर्व भागातील वाहतुकीची कोंडी होणारी ठिकाणे, ट्रॅफिक सिग्नल्स या ठिकाणी 'वेकअप पुणेकर'चे स्वयंसेवक थांबतील आणि वाहनचालकांकडून प्रश्नावलीचा फॉर्म भरून घेतील. या प्रश्नावलीत समस्येवरील उत्तरेही अपेक्षित केलेली आहेत. १५ दिवसांनंतर या फॉर्म च्या आधारे माहिती संकलित केली जाईल आणि पुणेकरांनी सुचविलेल्या उपाययोजनांची छाननी करून ती राबविण्यासाठी 'वेकअप' पुणेकर मार्फत कसोशीने प्रयत्न करण्यात येतील. वाहतुकीच्या कोंडीत 'अडकलाय पुणेकर', 'वेकअप पुणेकर' अशी घोषवाक्य लिहीलेले फलकही पूर्ण शहरात लावण्यात येतील, असे मोहन जोशी यांनी सांगितले.

ट्रॅफिक आदी नागरी प्रश्नांवर या मोहीमा राबविण्यात सातत्य ठेवण्यात येईल. क्षेत्रात काम करणाऱ्या संस्था, पोलीस प्रशासन, शाळा-महाविद्यालयांना या लोकचळवळीशी जोडून घेतले जाणार आहे. विविध विषयांवर परिषदा, कार्यशाळा घेतल्या जातील. संबंधित खात्याकडे पुणेकरांनी सुचविलेल्या उपाययोजना मांडून त्याचा पाठपुरावा केला जाईल, या समस्यांसाठी सोशल मिडिया चा प्लॅटफॉर्मही वापरण्यात येईल, असे मोहन जोशी यांनी सांगितले.

**पुणेकरांना भेडसावणारा ट्रॅफिक हा विषय प्राधान्याने हाती घेत आहोत. पुण्यात दुचाकी, चारचाकी वाहनांची संख्या वाढते आहे. शाळा, कॉलेजेस, ऑफिसेस, रूग्णालये येथे जाण्यासाठी वाहनांचा वापर अनिवार्य झालेला आहे. पार्किंगची समस्या वाढते आहे. पार्किंगच्या मुद्द्यावरून वादावादीचे प्रसंग उदभवतात. दूर अंतरावर जाण्यासाठी वाहनचालकांना मनःस्ताप सहन करावा लागतो. या कारणांनी ट्रॅफिक या मुद्द्याला महत्त्व देण्यात आले आहे.**



## सोयाबीनच्या दरात घसरण



**नाशिक** : केंद्र सरकारने सोयाबीन आयात केल्यामुळे पिंपळगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पालखेड उपबाजार कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सोयाबीनच्या दरात एक हजार रुपयाची घसरण झाल्याचे दिसून येत आहे.

नाशिक जिल्ह्यातील पिंपळगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पालखेड उपबाजार कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सोयाबीनच्या भावात हजार रुपयाची घसरण झाल्याचं दिसून येत असून केंद्र सरकारच्या धरसोडीच्या धोरणाला शेतकरी हैराण झाला आहे. केंद्र सरकारने सोयाबीन आयात केल्याने या सोयाबीनच्या दरामध्ये घसरण झाल्याचे देखील यावेळी शेतकऱ्याचं सांगणं आहे.

सध्या सोयाबीनला ४ हजार ते ४२०० रुपये भाव मिळत असल्याने केलेला उत्पादन खर्च देखील निघणे मुश्किल झाल्याने सोयाबीनला सात ते साडेसात हजार रुपये भाव द्यावा जेणेकरून शेतकऱ्याचा उत्पादन खर्च निघेल अशी अपेक्षा आता सोयाबीन उत्पादक शेतकरी करताना दिसत आहे. तरी सरकारने सोयाबीन आयात करू नये अशी मागणी शेतकरी करताना दिसत आहे.

# १६ नोव्हेंबरलाच मी मंत्रिपदाचा राजीनामा दिला; छगन भुजबळांचा मोठा गौप्यस्फोट

मी अशी भाषणे करतो, सरकारमधले, विरोधी पक्षातील सगळे बोलतात, तुम्ही राजीनामा द्या, हिंमत असेल तर राजीनामा द्या. माझ्या सरकारमधीलही नेते बोलतात. काल-परवा एकजण बडबडला. या भुजबळाला कमरेत लाथ घालून मंत्रिमंडळाला बाहेर हाकला असं म्हणाला. मला त्या सर्वांना विरोधी पक्ष, स्वपक्षातील, सरकारला सांगायचे आहे. १७ नोव्हेंबरला जालनातील अंबडला रॅली झाली. १६ नोव्हेंबरला मी मंत्रिमंडळाचा राजीनामा दिला. त्यानंतर अंबडच्या सभेला रवाना झालो. लाथ मारण्याची मला गरज नाही. अडीच महिने मी शांत राहिलो, याची वाच्यता नको असं मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले. लाथ मारायची गरज नाही. मी शेवटपर्यंत ओबीसीसाठी लढणार आहे असा गौप्यस्फोट मंत्रीछगन भुजबळयांनी केला. अहमदनगरच्या ओबीसी एल्गार मेळाव्यातछगन भुजबळम्हणाले



की, ३६० कोटी रुपये देऊन खोटा रेकॉर्ड केला जात आहे. नोंदीमध्ये खाडाखोड केली जातेय. सगेसोयरे म्हणून खोटी प्रमाणपत्रे दिली जातायेत. हायकोर्टाचा निकाल आहे. त्यात न्यायाधीशांनी स्पष्ट म्हटलंय, सर्व मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्रे दिली तर ओबीसींची आरक्षण संपून जाईल असं निकालात सांगितलं आहे. खोटी वंशावळ जुळवण्याचे प्रकार वाढणार आहेत. खोटे प्रमाणपत्र देऊन कुणबी दाखले देण्याचे प्रकार माझ्या हाती आलेत. झुंडशाहीने असं कुणी आरक्षण घेतले तर त्याला कोर्टात आव्हान देता येईल असं निकालपत्रात सुप्रीम कोर्टाने म्हटलं आहे असं त्यांनी सांगितले. मागासवर्गीय आयोगाचा सर्व्हे सुरू आहे तो सगळा खोटा आहे. घराघरी जातायेत, १८० प्रश्न आहेत. एका घराला दीड तास लागतो. तपासणी करणारे कधी २५, कधी ५० घरांची तपासणी केली सांगून टाकतात. त्यात केवळ जात विचारली जाते, बाकी सगळे आपोआप भरले जाते. बंगला असला तरी झोपडी, घराबाहेर गाड्या असल्या तरी काहीच नाही सांगितले जाते. ३ न्यायाधीश बसले आहेत. सुप्रीम कोर्टाच्या न्यायाधीशापेक्षा डबल पैसे घेतात. गुलाल उधळला मग पुन्हा उपोषण कशाला, कोणासाठी या प्रश्नांची उत्तरे कोण देणार? असा घणाघात मंत्री छगन भुजबळ यांनी केला आहे.तसेच एक एक मागणी उपोषणकर्त्याकडून केली जाते. मराठा समाजाला आरक्षण मिळाले नाही तर ओबीसीला मिळणाऱ्या सर्व सुविधा त्यांना द्यायच्या, मग त्या सुविधा ब्राह्मण, जैन, सर्व गोरगरिबांना देऊन टाका. ज्यादिवशी मागणी केली जाते त्यादिवशी जीआर काढला जातो. कोर्टाचे अनेक निकाल आले आहेत. परंतु तरीही राज्यात हे सर्व सुरू आहे. मग मराठा समाजाला ४० लाखांपर्यंत विना व्याज कर्ज दिले जाते, मग ते ओबीसी समाजालाही द्या अशी म्हणण्याची वेळ आता आली आहे. सर्वांनी ठरवलं तर एकत्र यायचे तर सर्वकाही होईल असंही आवाहन छगन भुजबळांनी केले. दरम्यान, मला मराठा समाजाच्या नेत्यांची, विचारवंताची कीव येते, हा तुमचा नेता कसा? जो बजेटमधून आरक्षण देता येते का बघा असं म्हणतो, कुणी बोलायला तयार नाही. कुणाच्या मागे जाताय? गावागावात दरी पडतेय, आम्ही आमच्या हक्काची लढाई लढतोय. मराठा समाजाला त्यांचे वेगळे आरक्षण द्या आणि आमच्यातून नको असं बोलणं चूक आहे. ओबीसीतून आरक्षण घ्यायचे आणि मंडल आयोगालाच आव्हान देण्याची भाषा केली जाते. काय हुशार, दादागिरी करायची. तुम्ही सगळे एकत्रित राहा. एकावर अन्याय झाला तर सगळ्यांनी एकत्रित उभं राहिले पाहिजे असं आवाहन मंत्री छगन भुजबळ यांनी केले.

# अर्जुन अभ्यंकर पुणे जिल्हा टेनिस स्पर्धेत अजिंक्य



**पुणे** : मेट्रोपॉलिटन डिस्ट्रिक्ट टेनिस असोसिएशन (पीएमडीटीए) तर्फे आयोजित जिल्हा स्तरावरील टेनिस स्पर्धेत पुरुष खुल्या गटात अर्जुन अभ्यंकरने अजिंक्यपद पटकावले. मिलेनियम स्कूलमधील टेनिस कोर्टवर खेळवल्या गेलेल्या या स्पर्धेत जवळजवळ १०० खेळाडूंनी सहभाग घेतला होता.

स्पर्धेत अग्रमानांकित असलेल्या अर्जुन अभ्यंकरने उपांत्यपूर्व फेरीत नील जोगळेकरवर ७-१ अशी सहज मात केली. तर उपांत्य फेरीत अर्जुनने चतुर्थ मानांकित अनमोल नागपुरेचा ४-२ ५-४(३) असा पराभव करत अंतिम फेरी गाठली.

अंतिम सामन्यात सुमारे अडीच तास चाललेल्या संघर्षपूर्ण लढतीत अर्जुनने तृतीय मानांकित पॉलवर ३-५ ५-४(३) ४-२ असा विजय नोंदवत विजेतेपदाच्या चषकावर स्वतःचे नाव कोरले.

अर्जुन अभ्यंकर हा बी.एम.सी.सी. महाविद्यालयाचा एफ.वाय.बी.कॉम.चा विद्यार्थी असून सोलारिस क्लब येथे प्रसनजीत सरांच्या मार्गदर्शनाखाली सराव करतो. या यशामुळे अर्जुनला राज्यस्तरीय स्पर्धेत पुणे जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्याचा मान प्राप्त झाला आहे.

# स्व. भाऊसाहेब महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त विविध कार्यक्रम उत्साहात

**सातारा** : सातारा तालुक्याचे भाग्यविधाते, अजिंक्य उद्योग समूहाचे शिल्पकार स्व. श्रीमंत छ. अभयसिंहराजे भोसले तथा भाऊसाहेब महाराज यांच्या २० व्या पुण्यतिथीनिमित्त विविध धार्मिक, समाजोपयोगी कार्यक्रम उत्साहात सम्पन्न झाले. अजिंक्यतारा सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर सुरु असलेल्या कीर्तन महोत्वाची सांगता काल्याच्या कीर्तनाने करण्यात आली. यावेळी आ. श्रीमंत छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले, ह.भ.प. संभाजी महाराज शेळके, ह.भ.प. बाबामहाराज गजवडीकर यांच्यासह अनेक मान्यवर आणि वारकरी सांप्रदायातील मंडळी उपस्थित होते.

सातारा तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उप बाजार आवार (कणसे ढाब्याजवळ, हाय वे) येथे जातिवंत खिलार जनावरांचे भव्य प्रदर्शन भरवण्यात आले.

एहसास मतिमंद शाळेत अजित साळुंखे मित्र परिवार नागठाणे यांच्या वतीने मिष्टान्न वाटप करण्यात आले.

पोवई नाका येथे सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत टाक्तदान शिबीर आणि अभिवादन कार्यक्रम झाला. यासह जिल्हा बँकेचे मुख्य कार्यालय आणि शाखा, विविध स्थानिक स्वराज्य संस्था, विविध गावच्या विकास सेवा सोसायट्या,ग्रामपंचायत कार्यालये आदी ठिकाणी स्व. भाऊसाहेब महाराज यांना अभिवादन करण्यात आले.

# भारतीय संस्कृतीतील आहार बालकांचे सुदृढ आयुष्य घडवते : डॉ अतुल पाटील

## नांदणी प्राथमिक आरोग्य केंद्रात बालकांची आरोग्य तपासणी शिबिर

**शिरोळ** : लहान मुलांचा आहार व विहार या दोन गोष्टी आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या असून आईचे दूध हाच सर्वोत्तम आहार आणि औषध आहे. आपल्या शिरोळ तालुक्यात कुपोषणाचा आकडा सर्वाधिक असून तो कमी करण्यासाठी सर्वांनीच भारतीय संस्कृतीच्या आहाराचा अवलंब करणे गरजेचे आहे. चॉकलेट, गोळ्या, बिस्किट, कुरकुरे व बाहेरील तेलकट पदार्थच आरोग्य बिघडवण्यास कारणीभूत ठरत असून या सर्व गोष्टींपासून दूर रहाणेच उत्तम आहे. भविष्यात बाळ सुदृढरित्या टिकवायचे असेल तर आडमिट करण्याचे प्रमाण कमी झाले पाहिजे. बदलत्या काळात लहान मुलांना टी.व्ही. व मोबाईलच्या व्यसनापासून दूर ठेवणे हि आज काळाची गरज



**शिरोळ तालुक्यातील नांदणीतील प्राथमिक आरोग्य केंद्रात बालकांचे मोफत तपासणी करणाऱ्या डॉक्टरांचा सत्कार करताना**

बनली आहे. असे प्रतिपादन बालरोग तज्ञ डॉ अतुल पाटील यांनी केले

ग्रामपंचायत नांदणी, कोपिअस हेल्थकेअर, रोटरी कलब ऑफ हेरिटेज सिटी शिरोळ, प्राथमिक आरोग्य केंद्र नांदणी आणि विद्यमान डॉक्टर्स हया सर्व संस्थांच्या संयुक्त विद्यमाने येथे मातोश्री चिल्ड्रन्स क्लिनिकच्या माध्यमातून ० ते १६ वर्षे वयोगटातील बालकांची मोफत आरोग्य तपासणी शिबीर संपन्न झाले. यावेळी अतुल पाटील हे बोलत होते

सरपंच सौ. संगीता तगारे, नांदणी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकिय अधिकारी डॉ. शर्वरी इंगळे, रोटरी क्लब ऑफ हेरिटेज सिटी शिरोळचे खजिनदार संजय शिंदे व सदस्य तसेच ज्येष्ट पत्रकार चंद्रकांत भाट पत्रकार राजीव कुचकर सुनील क्षिरसागर अमोल पाटील; कॉपीयस हेल्थ केअरच्या वतीने सौ मीनाक्षी सुतार ; सुमित पाटील ; राकेश लांबे तर मातोश्री चाईल्ड क्लिनिकमधील सौ प्राजक्ता कुरणे ; श्री फारुख मोमीन ; कु दिक्षा गंगधर ; अफताब कुरणे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते धन्वंतरी पूजन करून आरोग्य तपासणी शिबिराची सुरुवात करण्यात आली

प्रसिद्ध बालरोगतज्ञ डॉ. अतुल पाटील यांनी बालकांची आरोग्य तपासणी करत उपचाराबाबत मार्गदर्शन केले. नवजात बालकांमधील जन्मजात विकार, काळजी व उपचार, लसीकरण नोंद, बालकाची वाढ व वृध्दी यासंबंधी संपूर्ण माहिती, वारंवार होणारी जुनाट सर्दी, खोकला यावर उपचार, वयात येणाऱ्या मुलांच्या समस्या व उपचार, वारंवार होणारे पोटाचे आजार व उपचार, कमी वजनाच्या बालकांची काळजी व उपचार, बालकांचे निरोगी आरोग्य सवयी व बालकांची वाढ याविषयी डॉ अतुल पाटील यांनी मार्गदर्शन केले या आरोग्य तपासणी शिबिरास उस्फुर्त प्रतिसाद .

# शिर्डीतून लोकसभा लढविण्यास मी तयार,भाजपा नेतृत्वाशी चर्चा करणार : रामदास आठवले

**शिर्डी** : शिर्डी लोकसभा मतदान संघातून निवडणूक लढविण्यास आपण इच्छुक आहोत. याबाबत भाजपाचे जेष्ठ मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व मधुकर पिचड यांच्यासह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचेशी प्राथमिक चर्चा झालेली आहे. तांत्रिक अडचन आहे मात्र, भाजपाच्या वाट्याला शिर्डीची जागा गेल्यास आपण शिर्डीतून निवडनुक लढवण्याबाबत भाजपा नेतृत्वाशी चर्चा करणार असल्याचे केंद्रीय मंत्रीरामदास आठवलेयांनी सांगीतले.शिर्डी येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना केंद्रीय राज्य मंत्रीरामदास आठवलेयांनी सांगीतले की, देशात आणि राज्यात मोदींच्या नेतृत्वाखाली एनडीए मोठे यश मिळणार आहे. मोदी सरकारने संविधानाचा सन्मान केला



आहे मात्र, काँग्रेसने सातत्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा द्वेष केला. संविधनाच्या नावावर काँग्रेस चुकीचा आरोप सरकारवर करत आहे. संविधनाबाबतच्या काँग्रेसने भाजपावर केलेल्या आरोपात कोणतेही तथ्य नाही. उलट काँग्रेसनेच डॉ. बाबासाहेब आंबकरांचा वारवांर केलेला अपमान दलित समाज कदापीही विसरणार नयल्याचे आठवले यांनी सांगितले.प्रकाश आंबेडकरांनी महाविकास आघाडीबरोबरच नाही तर उध्दव ठाकरेंबरोबरच जाण्याचा निर्णय घेतला आहे. अद्याप त्यांना इंडीया आघाडीत समाविष्ट करण्यात आले नाही. तरी प्रकाश आंबेडकरांनी राज्यात लोकसभा निवडनुकीसाठी १२- १२-१२ जागांचा फॉर्मूला आघाडीसमोर ठेवला आहे. त्याचा महाविकास आघाडीने विचार केला पाहीजे. उध्दव ठाकरे यांना भाजपामधील नेत्यांच्या घराणेशाहीबद्दल बोलण्याचा नैतिक अधिकार नाही. मुख्यमंत्री असताना उध्दव ठाकरेंनी स्वत:च्या मुलाला आपल्या मंत्रीमंडळात स्थान दिल्याचे त्यांच्या स्मरणात राहीलेले नाही. एकनाथ शिंदे आमदारांसमवेत भाजपासोबत आले, त्यावेळी उध्दव ठाकरे यांनी शिंदे गटासोबत यायला हवे होते. भविष्यात ठाकरेंची काँग्रेस आणि राष्ट्रवादी सोबत राजकीय सोयरीक टीकणार नाही. त्यांनी जर भाजपासोबत येण्याची इच्छा व्यक्त केली तर आपण त्यासाठी प्रयत्न करू. आगामी लोकसभा निवडणुकीत मोदींच्या नेतृत्वाखाली एनडीए चारशे जागांचा आकडा पार करेल असा विश्वास आठवले यानी व्यक्त केला.राज्यातील दलित जनता आमच्यासोबत असल्याने वंचीतचा फटका महायुतीला अजिबात बसणार नाही. लोकसभा निवडणुकीसाठी आरपीआयला दोन जागा एनडीएकडून मिळाव्यात, यासाठी आमचा प्रयत्न आहे . लालकृष्ण आडवानी यांना भारतरत्न देण्याबाबत घेतलेल्या निर्णयाचे स्वागत आहे. भविष्यात अण्णाभाऊ साठे आणि महात्मा फुले यांना भारतरत्न देण्याबाबत पंतप्रधान मोदींशी आपण चर्चा करणार असल्याचे आठवले यांनी सांगितले.



**फित कापून फलटण अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय उद्घाटन करताना मुबई उच्च न्यायालयातील न्या. प्रकाश नाईक, शेजारी जिल्हा व सत्र न्यायाधीश न्या. विनायक जोशी व मान्यवर,**

# अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयात वकिलांनी पक्षकाराची बाजू अभ्यासपूर्वक मांडावी : मुंबई उच्च न्यायालय न्या. प्रकाश नाईक

**फलटण** : अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाच्या माध्यमातून या भागातील लोकांना वेळ व पैशाची बचत करुन, प्रवास टाळून येथे घराजवळ न्याय मिळण्याची संधी प्राप्त झाली आहे, त्याचा लाभ लोकांना मिळवून देण्यासाठी वकिलांनी आपल्या पक्षकाराची बाजू अभ्यासपूर्वक मांडून काम करण्याचे आवाहन मुंबई उच्च न्यायालयातील न्या. प्रकाश नाईक यांनी केले.

फलटण येथे अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय उद्घाटन न्या. नाईक यांच्या हस्ते समारंभपूर्वक झाले, त्यानंतर उपस्थितांना मार्गदर्शन करताना न्या. नाईक बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश न्या. विनायक रा. जोशी होते. यावेळी फलटणचे अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश न्या. प्रविण विमलनाथ चतुर, महाराष्ट्र गोवा वकील संघाचे माजी अध्यक्ष ड. भोसले विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.

आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर, खा. रणजितसिंह नाईक निंबाळकर, प्रल्हादराव साळुंखे पाटील, जिल्ह्यातील सर्व तालुकास्तरीय न्यायायातील न्यायाधीश, तेथील वकील संघांचे अध्यक्ष, पदाधिकारी, सदस्य, महसूल व पोलिस अधिकारी, पक्षकार उपस्थित होते.

न्याय हा घटनात्मक अधिकार असून तो सर्वांना मिळालाच पाहिजे, तो या न्यायालयात नक्की मिळेल याची ग्वाही देत,

वकील व न्यायालय यांची सांगड असल्याशिवाय न्यायालयाचे कामकाज सुरळीत चालणार नाही, गरज नसेल त्यावेळी तारखा न घेता प्रत्यक्ष कामकाज चालवून लवकर न्याय प्रक्रिया गतिमान करा, लोकांचा न्याय व्यवस्थेवरील विश्वास ढळू देवू नका असे आवाहन न्या. प्रकाश नाईक यांनी केले.

कोणत्याही खटल्यामध्ये दोन बाजू असतात, न्याय एकालाच मिळतो, मात्र वकिलांनी आपल्या पक्षकाराची बाजू अभ्यासपूर्वक मांडून त्यांचा विश्वास जपला पाहिजे, कोर्टाशी भांडून नव्हे आपली बाजू कायदेशीर दृष्ट्या भक्कमपणे मांडून पक्षकाराचा विश्वास सांभाळा असे आवाहन न्या. नाईक यांनी वकिलांना केले.

स्वातंत्र्य संग्रामात वकिलांचा सक्रिय सहभाग होता, लोकांना कायदेशीर मार्गदर्शन करण्यात वकील कार्यरत असतात, सामाजिक क्षेत्रातही वकिलांचा मोठा सहभाग असल्याचे न्या. नाईक यांनी आवर्जुन सांगितले.

पक्षकाराची बाजू भक्कमपणे मांडण्यासाठी वकिलांनी प्रोसिजरल लॉ, इव्हीडन्स क्ट, न्यायशास्त्र, इंडीयन पिनल कोड वगैरे कायद्याचा अभ्यास तर केलाच पाहिजे त्याशिवाय विविध निकाल आणि अवांतर वाचन केले पाहिजे, त्याशिवाय भाषेवर प्रभुत्व असले पाहिजे कोर्टासमोर बाजू मांडताना सहजपणे मात्र अभ्यासपूर्ण बाजू मांडल्याने न्यायालय आपली बाजू एकण्यास अधिक वेळ देते आणि आपली बाजू समजावून घेतल्याने न्यायासाठी त्याचा निश्चित उपयोग होत असल्याचे न्या. नाईक यांनी निदर्शनास आणून दिले.

फलटण वकील संघाच्या सदस्यांना या न्यायालयाच्या माध्यमातून आपली वकिली अधिक चांगल्या प्रकारे वृध्दींगत करण्याची संधी उपलब्ध झाली आहे, आपली बाजू प्रभावीपणे कशी मांडावी, उलट तपासणी कशी घ्यावी हे आत्मसात करा त्यासाठी संविधानाचा अभ्यास करा, निकाल पत्रांचा अभ्यास करा, वक्तृत्व कला विकसित करा असे आवाहन यावेळी न्या. नाईक यांनी केले.

यावेळी महाराष्ट्र गोवा वकील संघाचे माजी अध्यक्ष ड. भोसले, फलटण वकील संघाचे अध्यक्ष ड. पठाण यांची भाषणे झाली. वकील संघाचे उपाध्यक्ष ड. सस्ते यांनी समारोप व आभार मानले.

# भजन स्पर्धेमध्ये सोंडे सरपाले शाळा जिल्ह्यात यश

## स्वरचित गवळणसह मधुर तालमय आवाजाचा विजय ; सोंडे सरपाले गावात आनंदी वातावरण

**वेल्हे** : पुणे जिल्हा परिषदेच्या वतीने बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडानगरीत आयोजित केलेल्या यशवंतराव चव्हाण कला, क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवात भजन स्पर्धेत मोठ्या गटातून सोंडे सरपाले (ता.वेल्हे) या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या संघाने घवघवीत यश संपादन करीत जिल्ह्यात तिसरा क्रमांक पटकाविला.

जिल्हास्तरीय स्पर्धेत प्रथमच सोंडे सरपाले शाळेस भाग घेण्याची संधी मिळाली याचं सार्थक करत सोंडे सरपाले शाळेने विजयश्री खेचून आणली व भजन स्पर्धेत वेल्हे तालुक्याचे प्रतिनिधित्त्व करत जिल्ह्यात विजयाला गवसणी गवसणी घातली.

या यशाबद्दल सोंडे सरपाले ग्रामपंचायतीचे विद्यमान सरपंच पूनम बढे व उपसरपंच माधुरी सरपाले, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष,



**बालेवाडी (पुणे) : भजन स्पर्धेत विजयी स्पर्धकांना बक्षीस देऊन सन्मानित करताना मान्यवर.**

उपाध्यक्ष, सदस्य, पालक व ग्रामस्थांनी विजयी स्पर्धकांचा व मार्गदर्शक शिक्षकांचा सन्मान केला.

सोंडे सरपाले शाळेच्या भजन संघात रिया राहुल सरपाले, समृद्धी रामदास गिरंजे, सृष्टी सुदाम गिरंजे, वैभवी तानाजी कोंढाळकर, संजीवनी महेश जाधव, सायली नवनाथ वीर, गौरी नवनाथ वीर, श्रीनाथ नाना सरपाले, सोहम सुनील खोपडे, सार्थक काळूराम कोंढाळकर, कुणाल नाना कार्ले या विद्यार्थ्यांचा समावेश होता.

या यशासाठी शाळेचे संगीत शिक्षक रविंद्र खंडाळकर यांनी स्वतः संगीत संयोजन केलेली गवळण यात बसवली व भजनाची सर्वोत्तम तयारी करून घेतली. शाळेच्या मुख्याध्यापिका दिपाली घोडके, पदवीधर शिक्षक पुरुषोत्तम कुलकर्णी, उपशिक्षिका वंदना जोशी व चैतन्य कुंभार, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष तानाजी कोंढाळकर, उपाध्यक्षा अश्विनी सरपाले यांनी परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांना भजनातील ड्रेस कोड साठी लागणारा संपूर्ण खर्च गावातील सामाजिक कार्यकर्ते प्रकाश बढे यांनी केला. या यशाबद्दल शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड, वेल्ह्याचे गटविकास अधिकारी पंकज शेळके, गटशिक्षणाधिकारी चंद्रकांत उगले, माजी जिल्हा परिषद सदस्य अमोल नलावडे, सरपंच पुनम बढे, उपसरपंच माधुरी सरपाले, शिक्षण विस्तार अधिकारी दीपक नलावडे, केंद्रप्रमुख प्रवीण इंदलकर आदींनी अभिनंदन केले.